# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 03/01/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### फसवणुक

**पो.स्टे. नरखेड** :- अंतर्गत दिनांक ०७/१०/२०२२ पासुन ते २८/१२/२०२२ पर्यंत दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे अश्लील फोटो व व्हिडीओ क्लिप पाठवुन धमकी दिली "जर तु मला पैसे दिले नाही तर मी तुझे अश्लील फोटो व व्हिडीओ तुझ्या नातेवाईकांना व फोन मध्ये सेव असलेले कॉन्टेक्ट नंबरवर वायरल करेल" तेव्हा फिर्यादीने माझ्या जवळ पैसे नसल्याचे म्हटल्यावर यातील अज्ञात आरोपीने पुन्हा फिर्यादीस आय. सी. आय. सी. आय या बॅकेची लिंक पाठवुन म्हणाला की "तु या बॅकेची लिंक ओपन करुन पैसे घेवुन मला सेंड कर" तरी फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्याने अज्ञात आरोपीने फिर्यादीस वारंवार फोन करुन धमकी दिल्याने फिर्यादीने त्याचे मित्रा कडुन २०,०००/-रु घेवुन गुगल पे द्वारे पाठविले. नंतर आय. सी. आय. सी. आय. बॅक लोन लिंकद्वारे १६८४८/-रु जमा झाले त्यानंतर दि. १३/१०/२२ रोजी मोबाईल नंबरवर व्हॉट्स ॲप नंबर वरुन फिर्यादीस पैसे मागणी व लिंक द्वारे घेतलेले कर्ज परतफेड बाबत मॅसेज आला त्या नंतर फिर्यादीने त्याचे एक्सीस बॅक च्या गुगल पे वरुन ९,४४९/-रु सेड केले. परंतु फिर्यादीस त्यानंतर सुध्दा कर्ज परत फेडी करीता विविध नंबर वरुन ऑन लाईन कॉल येतच राहील्याने फिर्यादीने १) रॉयल कॅश, २) वन लोन ३) एन धन ४) स्वीफ्ट लोन ५) गॅलेक्सी लोन ६) शाईनी रुपी अश्या विविध लोन ॲप वरुन ४,४७,४५५ कर्ज घेतले व कर्जाच्या परत फेडी तसेच वेळोवेळी धमकावुन मागणी केलेल्या पैश्यासाठी फिर्यादीने त्याचे एक्सीस बॅकेचे खाते मधुन ६,७९,८५०/-रु असे विविध पेमेंट ॲप्स मध्ये एकुण १०,२२,७१८/-रु बालदग्रहण केल्याचे फिर्यादीने दिलेले तोडी रिपोर्ट वरुन सदर गुन्हा नोद करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८४, ४२०, ५०७ भा.द.वि सह कलम ६६(ड), ६७ माहीती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरिक्षक जयपालसिंग गिरासे पोलीस स्टेशन नरखेड मो क्र ८३५५९५५५३८ हे करीत आहे.

## खुन करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. केळवद** :– फिर्यादी नामे– प्रमोद विनायक घोडमारे, वय ३३ वर्ष, रा. नांदोरीता ता. सावनेर जि. नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन केळवद येथे अप. क्र. १४०/२०२० कलम ३०२, २०१ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयातील यातील आरोपी नामे– विक्की बाबाराव धराळे, वय २९ वर्ष, रा. नांदोरीता सावनेर जि. नागपूर याने हेमराजजी डोळस याचे शेतातील विहीरी जवळ मृतक नामे– राजु मुरलीधर जोगी, वय २९ वर्ष, रा. नांदोरी याचे डोक्यावर, चेहऱ्यावर, तोंडावर बोथड दगडाने मारून गंभीर जखमी करून जिवानीशी ठार केले व पुरावा नष्ट करण्याचे हेतुने मृतकास विहीरीत टाकुन दिले.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक पंकज गजानन वाघोडे पोस्टे केळवद यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ०३/०१/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. आर. आर. भोसले सा. यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भादंवि. मध्ये आजिवन कारावास व २०,०००/– दंड, दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास कलम २०१ भादवी मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व ५००० रू दंड दंड न भरल्यास २ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. जिकार यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार रविन्द्र अनंतराव डोरले पोस्टे केळवद ब. नं. ३१ यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**